# जाहीर सुचना

सुचित करण्यात येते की, समाज कल्याण विभाग , जिल्हा परिषद, यवतमाळ अतंर्गत २० % जि.प. सेस निधितुन सन २०२४-२५ करीता मागासवर्गीय भजनी मंडळांना भजनी साहित्य पुरविणे ही योजना राबविण्यात येत असुन सदर योजनेअंतर्गत भजनी मंडळांना भजनी साहित्य संच पुरवावयाचे आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | योजनेवरील तरतुद | साहित्याचा तपशिल | साहित्याचे विवरण |
|---|---|---|---|
| १ | रु. ५.०० लक्ष | १. हार्मोनियम १ नग | ३¼ सप्तक, डब्बल रीड, सागवान बॉडी, हॉर्टिकल, साईड कडी पितळी. |
| | | २.डग्गा १ नग | ९ डायमिटर, स्टील बॉडी, एकनंबर वादीसह |
| | | ३. चाटी १ नग | लाकडी बॉडी १०½ ५½ डायमीटर वादी एकनंबर लाकडी ठोकळे व लोंखडी हातोडी |
| | | ४.दोन जोडी पितळी टाळ | एक जोडीचे वजन २०० ग्रॅम असावे व ७ से.मी. व्यासाचे असावे |

करीता वरीलप्रमाणे साहीत्य पुरविणेकरीता मुळ उत्पादक/अधिकृत विक्रेता यांचेकडुन खालील अटी व शर्तीसह व कागदपत्रासह बंद लिफाफयात दरपत्रक मागविण्यात येत आहे.

1.सदर साहित्य हे यवतमाळ जिल्हयातील सर्व पंचायत समितीचे गोडावुन पर्यंत पोहोच करावे लागेल.
2.साहित्याचे दर हे सर्व करासह व सर्व खर्चासह नमुद करावे.मंजुर झालेल्या दराशिवाय कोणताही वाढीव दर देण्यात येणार नाही.
3.पुरवठादार उत्पादक असल्यास लघुउदयोजक नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडावे तसेच पुरवठादार हा अधिकृत विक्रेता/वितरक असल्यास मुळ उदयोजकाचे अधिकृत विक्रेता/वितरक असल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.
4.दुकाने नोंदणी प्रमाणपत्र (गुमास्ता) सोबत जोडावे.
5.उदयम आधार प्रत सोबत जोडावी.
6.जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र व दि.31/3/2024 पर्यंत जी.एस.टी भरणा केलेबाबतचे प्रमाणपत्र किंवा नो डयुज प्रमाणपत्र सोबत जोडावे.
7.मागील तीन वर्षाचे आयकर भरल्याबाबतचे I.T.R सोबत जोडावे.
8.खरेदी प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर पुरवठादाराने पुरविलेल्या साहित्यापैकी कोणत्याही एका संचाची RANDOM तपासणी शासन निर्णयातील सक्षम संस्थेकडुन करण्यात येईल व सदर साहित्य योग्य दर्जाचे असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयकाची ९०% रक्कम संबधीत पुरवठादारास अदा करण्यात येईल.साहीत्याच्या तपासणी फी ची रक्कम संबधीत पुरवठादारास अदा करावी लागेल.संपुर्ण साहीत्य वाटप झाल्यानंतर उर्वरीता १०% रक्क्म पुरवठादारस अदा करण्यात येईल.
९.विक्रीपश्चात सेवा देण्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.
१०.विहित कालावधीत साहित्य पुरवठा न केल्यास नियमाप्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येईल.
११.मंजुर पुरवठादारास रु. 500/- च्या बाँडपेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.

उपरोक्तप्रमाणे भजनी साहित्य पुरविणेकरीता मुळ उत्पादक/अधिकृत विक्रेता यांनी दिनांक.-22/१०/२०२४ पर्यंत सांय.५.०० वाजेपर्यत बंद लिफाफयात आवश्यक कागदपत्रासह दरपत्रक समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,यवतमाळ यांचे कार्यालयात सादर करावेत.उपरोक्त अटीपैकी कोणतीही अट शिथील करण्याचा अथवा सदर खरेदी प्रक्रीया कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर रदद करण्याचा अधिकारी राखुन ठेवण्यात आलेला आहे.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी,**
**जिल्हा परिषद,यवतमाळ**

Santosh
Add. CEO
**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,यवतमाळ**